# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

## प्रेसनोट

दिनांक ०६/०४/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची मोठ्या प्रमाणात साठवणुक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई केलेबाबत.”**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक ०५/०४/२०२२ रोजी **महाळुंगे (ई) पोलीस चौकी तसेच तळेगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन** हद्दीत अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची मोठ्या प्रमाणात साठवणुक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०५/०४/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी **महाळुंगे (ई) पोलीस चौकीच्या हद्दीत सद्‌गुरु ऑटोकम्पोनन्ट्स प्रा.ली. गेट नंबर २०१, चाकण-तळेगांव रोड, महाळुंगे ता. खेड जि. पुणे** या कंपनीजवळ सिताबाई महाळुंकर यांच्या भाड्याचे रुममध्ये इसम नामे **सुशिल उर्फ अमित गुप्ता** हा स्वतः राहत असलेल्या रुममध्ये स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखूजन्य गुटख्याची विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणुक करुन विक्री करीत आहे. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी चाकण पोलीस स्टेशन अंकित महाळुंगे (ई) पोलीस चौकी हद्दीत १२:०० वाजता सापळा रचुन छापा टाकुन खालील मुद्देमाल मिळुन आला त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

१) १,९५,३८८/- रु किं चा शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखूजन्य गुटखा

-----------------------------------------

**असा एकुण १,९५,३८८/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन **अटक आरोपी नामे १) सुशिल उर्फ राधेशाम गुप्ता वय ३२ वर्षे रा. सद्‌गुरु ऑटोकम्पोनन्ट्स प्रा.लि. गेट नंबर २०१, चाकण-तळेगांव रोड, महाळुंगे ता. खेड जि. पुणे या कंपनीजवळ, रामचंद्र महाळुंगकर यांच्या भाड्याचे रुममध्ये मुळगांव मु.पो. मदारीपूर ता.जि. जालौन राज्य उत्तरप्रदेश तसेच पाहिजे आरोपी नामे २) रामा चौधरी वय अंदाजे २५ वर्षे रा. खालुंब्रे ता. खेड जि. पुणे (पुर्ण नांव पत्ता माहित नाही) ३) ओमप्रकाश उर्फ ओमजी बिष्णोई वय ४५ वर्षे रा. खालुंब्रे ता. खेड जि. पुणे (पुर्ण नांव पत्ता माहित नाही)** यांचेविरुध्द महाळुंगे (ई) पोलीस चौकी येथे गुरनं ४९२/२०२२ भादंवि कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास महाळुंगे (ई) पोलीस चौकी करीत आहे.

तसेच दिनांक ०५/०४/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे दुसऱ्या पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी **तळेगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत सदुंबरे ता. मावळ जि. पुणे येथील गाडे प्राव्हिजन स्टोअर्स चे पाठीमागील रुममध्ये इसम नामे समिर गाडे** हा त्याचे मालकीचे रुममध्ये शासनाने प्रतिबंधित केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची साठवणुक करुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी गिऱ्हाईकांना गुटख्याची विक्री करीत

आहे. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी **तळेगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन** हद्दीत सायंकाळी १६:१० वाजता सापळा रचुन छापा टाकुन खालील मुद्देमाल मिळुन आला त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

१) ३,७७,०९०/- रु किं चा तंबाखूजन्य गुटखा
२) ४,०००/- रु रोख रक्कम
३) ५,०००/- रु किं चा एक अॅण्ड्राईड मोबाईल जु.वा.किं.अं.

---------------------------------------

**असा एकुण ३,८६,०९०/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन **अटक आरोपी इसम नामे १) समिर दत्तात्रय गाडे वय ३८ वर्षे रा. सदुंबरे ता. मावळ जि. पुणे (गुटखा मालक) तसेच पाहिजे आरोपी नामे २) कल्लु उर्फे कृष्णमुर्ती राजेंद्र गुप्ता वय अंदाजे ३६ वर्षे रा. समता नगर, मेदनकरवाडी, चाकण ता. खेड जि. पुणे** यांचेविरुध्द तळेगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुरनं ७१/२०२२ भादंवि कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास तळेगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन करीत आहे.

**वरील दोन्ही कारवाईमध्ये एकुण ५,८१,४७८/- रु किं चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. डॉ. काकासाहेब डोळे, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. पद्माकर घनवट, पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि श्री. प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि श्री. धैर्यशिल सोळंके पोलीस अंमलदार विजय कांबळे, नितीन लोंढे, भगवंता मुठे, सचिन गोनटे, संगिता जाधव, राजेश कोकाटे, गणेश कारोटे, कल्याण महानोर, सुधा टोके, योगेश तिडके, रेशमा झावरे, सुमित डमाळ यांनी केली आहे.


RMD
PAN MASALA
RMD
PAN MASALA


120X115